प्रकरण चौथे

# वर्तमानातील मांग गुप्त बोलीचे स्वरूप

## प्रकरण चौथे

# वर्तमानातील मांग गुप्त बोलीचे स्वरूप

### ४.१ वर्तमानकाळातील मांग गुप्त बोली शब्दांचा वापर आणि जतन

भारतीय समाजव्यवस्था अनेक जातिजमातींनी बनलेली आहे. काही जातिजमातींची भाषा, स्वतंत्र संस्कृती व सण-उत्सव आहेत. आपापल्या भाषा आणि संस्कृतीचे जतन प्रत्येक जात मनापासून करीत असते; कारण ती त्यांची अस्मिता असते आणि जातीचे बंधनही असते. जातपंचायतीचा धाकही तेवढाच महत्त्वाचा असतो. जात ही भाषासंस्कृतीने बांधलेली असते. जातीच्या नियमांचे बंधन सर्वांनाच असते. त्यामुळे जातीमधील प्रत्येक जण भाषासंस्कृतीचे संवर्धन करीत असतो.

वर्तमानामध्ये जातपंचायतीची जातीवरील पकड काहीशी सैल झालेली आहे. एवढेच नव्हे तर मांग जातीत जातपंचायतीचे अस्तित्व दिसते. तसेच सध्या जागतिकीकरणाने विश्वबंधुत्वाची भावना निर्माण होत आहे. अनेक समाजगट, जातिजमाती एकमेकांजवळ येऊ लागल्या आहेत. म्हणजेच जातींमध्ये सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होऊ लागले आहे. त्यामुळे विशिष्ट जातीची भाषा आज कालबाह्य होऊ लागली आहे. मांग जातीची भाषा कालबाह्य होऊन काही प्रमाणातच ती आज अस्तित्वात आहे. प्रत्येक

जातीची असणारी भाषा दुसऱ्या जातीच्या माणसांना अवगत असत नाही. मांग जातीच्या माणसाबरोबर इतर जातीचा माणूस मांग गुप्त बोली बोलू शकत नाही; कारण त्याला ती भाषा अवगत असत नाही; त्यामुळे पूर्वी दोन जातींमध्ये एकीची भावना नव्हती; म्हणजेच संदेशवहन पूर्वी होत नव्हते. आज जातिजमातींमध्ये काही प्रमाणात संदेशवहन होत आहे. आपली स्वतःच्या जातीची भाषा न वापरता व्यावहारिक भाषा वापरून संदेशवहन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक जातीच्या भाषेवर मर्यादा येऊ लागल्या आहेत; त्यामुळेच मांग जातीतील लोक पूर्वी संदेशवहनासाठी गुप्त बोलीचा वापर मोठ्या प्रमाणात करीत होते; परंतु आजच्या काळात संदेशवहनासाठी आपल्या गुप्त बोलीचा त्याग करून त्या त्या प्रांतातील, देशातील व्यवहारी भाषा पूर्णपणे वापरण्यास सुरुवात केलेली दिसून येत आहे. त्यामुळे वर्तमानामध्ये मांग गुप्त बोली भाषा वापरली जात नाही. एवढेच नव्हे तर त्या जातिगटातील बऱ्याच जणांना या भाषेची पुसटशही माहिती दिसत नाही. काही ठरावीक ठिकाणी ही गुप्त बोली वापरली जाते. जातबांधव जर एकत्र आले असतील तर अशा वेळी काहीशा प्रमाणात मांग गुप्त बोलीचा वापर करतात. काही वेळा जातबांधवांना गुपित सांगायचे असेल, इतर जातींचे लोक त्या ठिकाणी असतील तर त्या वेळी या बोलीचा वापर केला जातो. मांग गुप्त बोलीमधील शब्दांची काही मर्यादा असल्यामुळे काही शब्दच फक्त वापरले जातात. सद्यस्थितीत काही ठरावीक शब्दच अस्तित्वात आहेत असे दिसते. व्यवहारी भाषेत ते शब्द वापरले जातात आणि भाषा बोलली जाते.

जातीची भाषा आणि तिच्या संस्कृतीचे संवर्धन होणे आवश्यक गोष्ट आहे; पण सध्याच्या काळात ते सर्वस्वी कठीग आहे. कारण इंग्रजीसारख्या भाषेचे प्राबल्य सबंध जगावर निर्माण होत आहे. अशा वेळी शासनानेच प्रत्येक जातीची संस्कृती, भाषा टिकविणे, तिचा विकास करणे या गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. अमेरिकेमध्ये तेथील आदिवासी रेड इंडियन जातीची भाषा आणि संस्कृती, वाङ्मय जतन करून ठेवले आहे. त्यासाठी त्यांनी योजना आखल्या आहेत. भारत सरकारनेसुद्धा अशा योजना आखल्या पाहिजेत.

## ४.२ गुप्त बोली वापरण्याची क्षेत्रे - प्रसंग

सद्यस्थितीत काही अल्प ठिकाणीच गुप्त भाषा वापरली जाते.

१) **जातपंचायत :** प्रत्येक जातिजमातीची ही विशिष्ट असणारी गुप्त बोली ही प्रामुख्याने जातपंचायतीमध्ये वापरली जाते. आज जातपंचायतीचे प्राबल्य कमी झाल्यामुळे त्या जातीमध्ये ती भाषा वापरली जात नाही. आज ठरावीकच शब्द उपलब्ध असताना दिसतात.

२) **विवाह, सण, उत्सव :** प्रत्येक जमातीमध्ये जे काही धार्मिक आणि सांस्कृतिक समारंभ आयोजित केले जातात, उदा. विवाह, बारसे, मर्तिकाचा माती सावडण्याचा कार्यक्रम किंवा अंत्यविधी, सण, उत्सव या प्रसंगी गुप्त बोली वापरली जाते. आज मरीआईची जत्रा काही गावांमध्ये साजरी केली जाते. त्या ठिकाणी ही भाषा वापरली जाते. उदा. टोणगा धादलणे. त्याबरोबरच पालीच्या खंडोबाच्या यात्रेत ही बोली वापरल्याचे

दिसते. जनावरांचे हेडेपण करणारे या जातीतील लोक ही भाषा वापरतात. बाजार वडगाव, जि. कोल्हापूर येथे ही भाषा बोलल्याचे आढळले.

३) **अनेक जातींच्या समुदायामध्ये :** आपल्या मनातील गुपित विचार प्रकट करताना दोन मांग त्यांच्या गुप्त बोलीमध्ये बोलतात. आज प्रत्येक ठिकाणी हे शब्द दिसतात. दुतवलंय का, वाय करू नकं आणि आटकुर दऱ्यात तटकुर तावलंय.

'नागिण पदमीण सौंदडफूल

करपटी सेगुण उखण'

एवढे शब्दच सर्वसामान्यपणे मांग जातीतील माणसाला येत असतात असे दिसते.

४) **पोलीस स्टेशन :** पोलीस स्टेशन किंवा अन्य तत्सम ठिकाणी आपण जे बोलतो ते दुसऱ्यांना समजू नये यासाठी गुप्त बोली बोलतात.

५) **राजकीय पीठ व कार्यकर्ता :** राजकीय कार्यकर्ता आपल्या जातीचा मेळावा आयोजित करतो. त्या वेळी आपण त्या जातीचे असल्याचा निर्वाळा देण्यासाठी प्रकर्षाने या बोलीचा वापर करताना दिसतो.

## ४.३ गुप्त बोलीचा ऱ्हास

मांग जातीचे परंपरेने चालत आलेले व्यवसाय औद्योगीकरणामुळे

व स्थलांतरामुळे अडचणीत आले. त्यांना व्यवसायांतर करणे भाग पडले. काही अल्प प्रमाणात मांग दोर, नाडे, सोल, कासरे इत्यादी तयार करण्याचे काम करतात. परंतु पूर्वीप्रमाणे जंतर किंवा पाठ हे मांगवाड्यामध्ये एक चिन्ह असे. तसेच आता आढळत नाही. हे व्यवसाय त्यांना नाइलाजाने सोडावे लागले. कारण त्यांना ग्राहक मिळण्याचे प्रमाण कमी झाले. नायलॉनच्या दोरांचा फार मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम त्यांच्या पारंपरिक धंद्यावर झाला आहे; त्यामुळे व्यवसायाचे स्थलांतर झाले. अनेकविध व्यवसाय करावे लागत आहेत. त्यामुळे जातीपासून फारकत घेऊन विविध ठिकाणी जावे लागत आहे. त्या ठिकाणी गुप्त बोलीचा वापर करणे योग्य होत नाही. परिणामी गुप्त बोलीचे विस्मरण होत चालले आहे.

जातपंचायतीचे नियम जातीला बंधनकारक असायचे; परंतु मांग जात पंचायतीची जातीवरील पकड ढिली झाली आहे. विविध जातिजमातींमध्ये बंधुभावाची, उदारमतवादी दृष्टी निर्माण झाली; त्यामुळे आपले व्यवहार करताना इतर जातींची मदत होऊ लागली; त्यामुळे कालांतराने गुप्त बोली ऱ्हास पावू लागली.

विकसित सांस्कृतिक जगाशी सतत संपर्क वाढला. भारताला स्वातंत्र्य मिळाले. शिक्षणाचा प्रसार झाला. आपली गुप्त भाषा आपण बोललो तर अप्रगत ठरू अशी भावना निर्माण झाली आणि त्यामुळे गुप्त भाषा संपुष्टात आली.

आधुनिकीकरणामुळे नागरीकरण वाढले. त्या ठिकाणी वेगवेगळ्या जातींशी संपर्क आला आणि व्यवहारभाषेची गरज निर्माण झाली. गुप्त बोली लोप पावली.

## ४.४ मातंग जात १८६० मॅन्युअलमध्ये गुन्हेगार

मांगांना इंग्रज शासकांनी १८६० च्या मॅन्युअलमध्ये ७ क्रमांकाच्या गुन्हेगारी जमातीत समाविष्ट केले होते. काही मांग गुन्हेगारी करीत असत. मांग दरोडेखोरांची उदाहरणे आहेत. काळू बाळू मांग हा दरोडेखोर होता. लाल्या मांग हादेखील प्रसिद्ध दरोडेखोर होता. मांग जातीच्या लोकांमध्ये त्यांच्याविषयी आदर होतो. तो श्रीमंतांना लुटी व गरिबांना साहाय्य करी. लाल्या मांगाचा पोवाडा प्रसिद्ध आहे. त्या लाल्या मांगाला मांगीरबाबा प्रसन्न असल्याचे वर्णन येते. दरोडेखोर म्हणून प्रसिद्ध असलेल्या मातंग जातीतील व्यक्तींच्या जीवनाचा अभ्यास केला तर दारिद्र्यामुळे वा त्यांच्यावर एखादा अन्याय झाल्यामुळे ते या मार्गाकडे वळले होते. गुन्हेगारीचे जीवन जगत असताही त्यांनी गोरगरिबांना मदत केली आहे. संकटात त्यांना साहाय्य केले आहे असे दिसते. ते दलितांचे, दीन-दुबळ्यांचे नायक होते. अशाच नायकाचे चित्रण साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या कादंबऱ्यांत केले आहे. 'फकिरा' हे नायकाचे प्रातिनिधिक चित्रण आहे. गुन्हेगारीचा अवलंब हा काही मांगांना नाइलाजाने करावा लागला; त्यामुळे भूमिगत हालचालींना सोईचे व्हावे म्हणून इतरांपासून संरक्षणासाठी त्यांना न समजणारी गुप्त भाषा वापरली जात होती. प्रत्येक मांगाला ती परंपरेने येत होती.

अलीकडच्या काळात मांगांना त्यांचे विस्मरण झाले आहे, असे दिसते. शिकलेल्या मांगांना गुप्त भाषा किंवा पारसी मुळीच येत नाही. तीस वर्षांपेक्षा कमी वयाच्या मांग स्त्री - पुरुषांना या भाषेचे ज्ञान नाही असे आढळले. याचे कारण असे की, त्याची त्यांना आता आवश्यकता राहिलेली नाही. जे काही थोडे लोक गुन्हेगारीत होते, त्यांनीही गुन्हेगारी वृत्तीचा त्याग केला आहे. निरनिराळे व्यवसाय स्वीकारले आहेत; म्हणून मांग गुप्त बोलीचा म्हणजेच पारसीचा ऱ्हास होत चालला आहे.

❖❖❖❖❖